# संक्षिप्त आढावा

## ०.१ प्रकल्पा बाबतची माहीती.

राष्ट्रिय डेअरी सहाय्यता प्रकल्पा अंतर्गत ( एन डी एस पी ) भारताला विश्व बॅंकेकडून निधी उपलब्ध होणार आहे.देशातील निरनिराळया राज्यात शास्त्रोक्त पध्दतीने आखणी करून हया प्रकल्पा अंतर्गत नवनवीन प्रकीया, जरूर ते धोरणात्मक बदल, तसेच नविन नियमांची जूळणी करणेत येणार आहे.असे केल्याने दुधाळ जनावरांची उत्पादकता वाढणार असून एकूणच देशात सतत वाढणाऱ्या मागणीला तोंड देण्यासाठी दूध उत्पादन वाढीचा प्रकल्प हाती घेणेत येणार आहे.विशेष करून हया प्रकल्पा अंतर्गत दूध उत्पादक शेतकरी संघटीत क्षेत्रामार्फत आपले दूध विकीसाठी उपलब्ध करून देऊ शकतील. एनडीएसपी चा पहिला टप्पा आक्टोबर २०११ पासून सप्टेंबर २०१७ या कालावधीसाठी राहील.

एन डी एस पी प्रकल्पा अंतर्गत करावयाचे कार्यवाहीसाठी छोटे विभाग आणि उपविभाग करणेत आले असून त्यामुळे सामाजिक आणि पर्यावरण विषयक बदल घडवून येण्यास मदत होणार आहे.हे बदल खरोखरच चांगले अथवा वाईट आहेत किंवा काय हे जाणून घेण्यासाठी तसेच झालेले बदल आणखीन जोमाने पुढे वाढवणे किंवा त्याचा परीणाम कमी करणे यासाठी एनडीएसपी च्या अंतर्गत एस ई एस ए – 'सेसा' म्हणजेच पर्यावरणावरती होणारा परीणाम व सामाजिक बदल कशा पध्दतीने होत आहे हे जाणून घेणेसाठी एन डी डी बी कडून एक त्रयस्थ एजन्सी मे.ईआरएम इंडिया प्रा.लि. यांचे मार्फत ते काम हाती घेणेत आले आहे. सेसा च्या संशोधनामुळे एनडीएसपी हया प्रकल्पाचे प्रारूप आराखडयात००० वेळ पडल्यास बदल करून त्याला योग्य दिशा देणेत येणार आहे.

## ०.२ सेसा कडून प्रकल्पाचा अभ्यास करणेसाठी अवलंबलेली कार्यपध्दती

सेसा अंतर्गत संशोधन करणेचे काम प्रकल्पाचे घटकांशी वारंवार चर्चा करून, नीतीनिर्धारण व नियमांचे बाबत तसेच पायाभूत स्वरूपाची माहीती या बावत प्रकल्पामध्ये हिस्सेदारी असणाऱ्या सर्वच घटकांबरोबर चर्चा करणेत आली व एनडीएसपी कार्यकमाचे अंतर्गत सामाजिक व पर्यावरणीय काय बदल होतील याचा आढावा घेणेत आला.एनडीएसपी चे जे काही बरे वाईट बदल होणार आहेत त्या बाबत सेसा या उपकमाव्दारे अभ्यास करणेत आला व या बदलामुळे प्रकल्पाचे हिस्सेदारावरती काय सामाजिक व पर्यावरणीय प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परीणाम होतील याचा विचार करणेत आला.

सेसा उपकमा अंतर्गत अभ्यास करणेसाठी मुद्दामच अनियंत्रीत नमुने (रॅन्डम सॅम्पलींग) घेणेत आले जेणेकरून मूलभूत सर्वेक्षणाअंतर्गत सामाजिक व पर्यावरणीय विषयक मुद्दे हे सरसकटपणे अभ्यासले जातील. या सर्वेक्षणाचे अंतर्गत भारतातील ४ राज्यातील ८ जिल्हयातील २८३ गावात सर्वेक्षण करणेत आले. गुजरात, कर्नाटक, पंजाब व बिहार ही ती चार राज्ये भारताच्या वेगवेगळया भागात विखूरलेली आहेत. या राज्यातील जिल्हा दूध संघावरोबर चर्चा करून सर्वेक्षण करावयाची गावे आणि सर्वेक्षणात अंतर्भूत करावयाचे पर्यावरणीय मापके समाविष्ट करणेत आली आहेत. एकूणच ८२९१ घरे (हाऊस होल्ड) मूलभूत सर्वेक्षणासाठी निवडणेत आली.

प्रकल्पामध्ये भाग घेणाऱ्या हिस्सेदारांना सर्वेक्षण, वैयक्तीक मुलाखात किंवा समुहातील चर्चेसाठी(फोकस्ड ग्रूप डिस्कशन) तसेच गावसभेसाठी विश्वासात घेणेत आले व त्यांचे मदतीने वरील काम केले.अशा तऱ्हेने ४०६ समूहचर्चा चार राज्यात घडवून आणणेत आल्या. त्यामध्ये महिला, मागासवर्गीय जाती, मागसवर्गीय जमाती, दूधाचा व्यवसाय करणारे गवळी यांचा समावेश करणेत आला.या व्यतीरीक्त गाव पातळी वरील दूध संस्था, जिल्हा दूध संघ, राज्यस्तरीय दूध महासंघ व इतर संबधीत संस्थांची पण मदत घेणेत आली.

## ०.३ निती निर्धारण व नियमांचे पूनरावलोकन

राष्ट्रिय व राज्य पातळी वरील नीती निर्धारण व नियमांचे सदर प्रकल्पाचे संदर्भात सामाजिक व पर्यावरणीय काय परीणाम होतात व विश्व बॅंकेत या बाबत जी काही सुरक्षा नियमावली घालून दिली आहे त्याचा आढावा घेणेत आला. हा आढावा घेतल्यामुळे सध्या प्रचलीत असलेले नीतीनियम व त्यामध्ये असलेली कमतरता व आणखीन नविन काय सुधारणा करावयाच्या आहेत की जेणेकरून पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापनचा आराखडा तयार होईल हे बघणेत आले.

## ०.४ पर्यावरणीय व सामाजिक पायाभूत आधार रेषा

या बाबत काही उल्लेखनीय सामाजिक व पर्यावरणीय निष्कर्ष खालील प्रमाणे.

- मुद्दामहूनच अशा प्रकारचे नमूने घेणेत आले की जेणेकरून मागास भागाचा त्यात समावेश करणेत आला. ५० टक्यापेक्षा जास्त घरे मागासवर्गीय जाती जमाती अशा लोकांची होती. सदर प्रवर्गातील जाती जमाती हया एकूणच देशातील मूळ प्रवाहात अद्यापही सामील झालेल्या नाहीत.या सर्व घरातील मुलाखात देणाऱ्यांनी दुग्धव्यवसाय हा महत्वाचा आर्थिक स्त्रोत्र निर्माण करणारा कार्यक्रम असलेचे नमूद केले आहे.
- पहाणी करणेत आलेल्या घरांचा कौटुविंक उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत्र शेती व्यवसायाशी निगडीत होता. उदा. दुग्धवयवसाय, शेती किंवा शेतमजूरी. जरी दूध उत्पादक शेतकऱ्यांची सर्व्हेमध्ये पहाणी करणेत आली तरी सर्व्हेमधील सर्वांनी कुटुंबातील एकूण उत्पन्ना पैकी ३० ते ५० टक्के उत्पन्न हे दुग्धव्यवसायातून होत असलेचे प्रांजळपणे नमूद केले आहे.
- सर्व्हेमधील जवळपास ९० टक्के कुटुंबे ही भूमीहीन, अल्पभूधारक(१ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र), लहान क्षेत्र धारण केलेले(२ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र) शेतकरी होते.
- दुधाळ जनावरांची विभागणी वापरातील जमिनीपेक्षा अधिक न्याय प्रमाणात असलेचे दिसून आले.
- सध्याचे पीक पध्दतीमध्ये वैरणीचे पीक घेण्यास महत्व नसलेचे जमीन मालकाकडील माहीती मध्ये दिसून आले.पाण्याची उपलब्धता असलेल्या व मोठया प्रमाणात शेती धारण करणाऱ्या कुटुंबांचा यास अपवाद दिसून आला. वैरणीच्या पिकांची उत्पादनशक्ती कमी असलेचे दिसून आले.
- दुधाळ जनावरांना पिकापासून शिल्लक रहाणारे अवशेष/काडया हेच प्रमुख खाद्य दिले जाते व त्यानंतर कुरण जमिनीतून उपलब्ध होणारा गवत चारा दिला जातो.

- सर्व्हे करणेत आलेल्या जवळपास ९५ टक्के एवढया कुटुबांनी दुधाळ जनावरांना गोठयातच खाद्य दिले जात असलेची माहीती दिली .
- घरगुती स्वरूपातील दुग्ध उत्पादनात महिलांचा सहभाग लक्षणीय असून त्यांना जनावराची प्रजनन पध्दत, माजावर आल्याची लक्षणे, सवयी या बाबतीत अधिक समज असलेचे दिसून आले आहे .
- प्राथमिक दूध संस्थेमध्ये महिला सभासदांचा वाटा पंजाब मध्ये १४ .२ टक्के व कर्नाटकात ३२ टक्के इतका असलेचे दिसून आले आहे .
- जनावरांची उत्पादकता वाढवणे व उच्च अनुवंशीक जनावरे निर्माण करणेसाठी कृत्रीम रेतन व्यवस्था उदयास येत असलेचे दिसून आले आहे .
- दूध उत्पादक प्राथमिक दूध संस्थेच्या माध्यमातून पशुखाद्य, कृत्रीम रेतन, जनावरांना औषध उपचाार पशुवैद्यकीय सेवा यासारख्या विस्तार सेवा सुविधांचा वापर करीत असून शासनाच्या पशूवैद्यकीय विभागाकडून मोफत लसीकरणाचे कार्यक्रम राबवले जात असलेचे दिसून आले आहे .
- जवळपास ५० टक्के शेणाचा वापर स्वयंपाकासाठी उपयुक्त जळणासाठीच्या गोऱ्या/शेणीसाठी केला जातो . बहुतेक ठिकाणी या कामामध्ये महिलांचा सहभाग आह . यापासून मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होत असलेचे दिसून आले आहे .
- जवळपास ७२ टक्के घरामध्ये असे नमूद करणेत आले की दूध देणाऱ्या जनावराला प्रतिदीन ३० लिटर पेक्षा कमी पाण्याची आवश्यकता असते .
- बहुतेक शेतकऱ्यांनी लाळ खुरकत व संसर्गजन्य गर्भपात यासाठी लसीकरणाची आवश्यकता असलेचे सांगीतले .
- बहुतेक ठिकाणी दूध उत्पादक शेतकऱ्यांना, जनावरांपासून मनुष्यास संक्रमीत होणाऱ्या रोगांची माहीती नाही .

## ०.५ हिस्सेदाराबाबत पृथ्थकरण व सल्लामसलत

प्रकल्पाच्या हिस्सेदारामध्ये दूध महासंघ, जिल्हा दूध संघ, प्राथमिक दूध संस्था, पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय विभाग, संशोधन संस्था व विद्यापीठे, दुग्ध विकास विभाग, दूध उत्पादक शेतकरी, महिला व मागास व इतर मागास प्रवर्गातील दूध उत्पादक शेतकरी, दुग्धव्यवसायात वेगवेगळया टप्यात कार्यरत असलेले असंघटीत घटक, पशुवैद्यकीय सेवा पुरवणारे , बिगर शासकीय संस्था, ग्रामपंचायत इत्यादी घटकांचा समावेश आहे . प्रकल्पाबाबत हिस्सेदारांशी पृथ्थकरण व सल्लामसलत करीत असताना खालील महत्वाचे सामाजिक व पर्यावरणीय मुद्दे निदर्शनास आले .

- शेती व दुग्धव्यवसाय व त्यासाठी आवश्यक वैरण लागवड यासाठी उपलब्ध जनिमीची कमतरता आढळली .
- दुग्धव्यवसाय हा उपजिवीकेचे साधन समजण्या ऐवजी व्यावसायीक पध्दतीने केला जाऊ लागल्यामुळे यावर आधारीत कौटुंबीक मजूरांची संख्या सातत्याने कमी होत आहे .

- शासनाची रोजगार हमी योजना, विशेष करून 'महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना' यामुळे श्रमजीवी मजूरांना मिळणारे वेतन वाढले आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात दुधाळ जनावरांचे गोठे उभारणे, संगोपन करणे अवघड झाले आहे.
- जनावरांच्या व्यवस्थापन पध्दती मधील बदलामुळे महिलांचा सहभाग वाढत जाणार आहे.
- मागास व इतर मागास जाती जमाती दुग्धव्यवसायास एकनिष्ठ रहातील असे वाटते तथापी त्यांचा सहभाग त्यांना एकूणच मिळणाऱ्या विस्तारीत सेवा सुविधा सवलती यावरती अवलंबून असणार आहे.
- वित्त संस्थांचे कर्जाचे/उधारीचे धोरण दुग्धव्यवसायापेक्षा शेतीला जास्त पूरक आहे.
- काही राज्यामध्ये प्राथमिक दूध संस्थामध्ये उदयास येत असलेले राजकारण हे एक काळजीचा विषय आहे.
- जिल्हा दूध संघाकडून प्राथमिक दूध संस्थेच्या माध्यमातून मिळत असलेल्या विस्तार सेवा सुविधा, नियमित दूध बिल पेमेंट हे सर्व घटक दूध उत्पादकाची दुग्धव्यवसायातील आवड टिकवून ठेवण्यास मोलाची भूमिका निभावत आहेत.
- गावपातळीवर पशुवैद्यकीय दवाखाने व पशुचिकत्सालय यांच्या कामकाजाच्या वेळा हे दुग्ध व्यवसायावरती मर्यादा निर्माण करणारे आहेत. अविकसीत भागात याची प्रकर्षाने जाणिव होते.
- दुग्धव्यवसायात बिगर शासकीय संस्थांचा सहभाग मर्यादीत आहे. ज्या काही ठिकाणी त्यांचा सहभाग आहे तिथे दुग्धव्यवसायाशी निगडीत विस्तार सेवा वाढवणे ऐवजी केवळ पशुधन वाढवणे याकडेच त्यांचा कल असलेचे दिसून आले आहे.

## ०.६ पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापना विषयाची मांडणी

सेसा अभ्यास गटाच्या निरीक्षणानुसार पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन समस्यांची सोडवणूक करणेसाठी योग्य असा 'पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा' (ईएसएमएफ) तयार करणेत आला असून त्याची अम्मलबजावणी एनडीएसपी चा भाग समजून केली जाणार आहे. यामध्ये प्रस्तावीत प्रकल्पामधून पर्यावरणीय व सामाजिक प्रभाव करणारे घटक (ई ॲन्ड एस) शोधले जाणार आहेत. त्यावरती विस्तृत अशी उपाय योजना केली जाणार आहे व त्याची मोजदाद करण्याची पध्दत निश्चीत केली जाणार आहे की ज्यामध्ये कार्यप्रक्रीया व अंतिम साध्य यांचा समावेश राहील. प्रकल्पाचे कालचकास सलग्न वेळापत्रक ईएसएमएफ मधून केले जाते. संस्थेची रचना पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापनास अनुसरून केली जाते व प्रकल्पातील पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन विषय हाताळणेसाठी आवश्यक त्या ठिकाणी प्रशिक्षण व क्षमता वाढीसाठी प्रयत्न केले जातात.

**आघात/प्रभाव करणाऱ्या घटकांची ओळख** ः मागचा पुढचा संबध , तीव्रता ,स्थान ,कालावधी अशा निवडक माध्यमातून आघात करणारे घटक ओळखले जातात. ईएसएमएफ व्दारे सकारात्मक प्रभाव करणाऱ्या घटकांचा प्रभाव वाढवला जातो व नकाारात्मक परीणाम करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी केली जाते. प्रकल्पामध्ये अशा ज्ञात घटकांचा समावेश सूरवातीपासून अंतर्भूत केला आहे.

सकारात्मक परिणाम करणाऱ्या घटकामध्ये दूध उत्पादकास उत्पन्न वाढवणेसाठी संधी निर्माण करणे, ग्रामिण भागामध्ये रोजगार वाढवणेच्या संधी निर्माण करणे उदा. कृत्रीम वियदान सेवक, सहाय्यक पशुवैद्यकीय मदतनीस, स्थानिक विस्तार सेवक, दूध गोळा करणारे व दूध शितकरण करणारे घटक इत्यादींचा समावेश होतो. दुधाळ जनावरांच्या अनुवंषीक समस्या वरती मात करून दुग्धउत्पादन वाढवणे व त्यायोगे दूध उत्पादकांचा आर्थिक स्तर उंचावणे याचा समावेश आहे.

प्रकल्पामधील बरेच पर्यावरणावर प्रभाव करणारे घटक जसे की सामुहीक आरोग्य, स्वास्थ्य, जमिन व पाणी हे प्रकल्पास सहाय्यभूत आहेत. भारत सरकारने घालून दिलेल्या सर्वसाधारण नितीनियमांचे पालन केल्यास त्यातील बहुतेक समस्यांची सोडवणूक होणार आहे. तथापी काही विशेष पर्यावरणीय मुद्यांची सोडवणूक यातून होत नसलेने त्यांचा समावेश 'पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा' (ईएसएमएफ) मध्ये करणेत आला आहे. बल्क मिल्क कुलरचा वापर करून वाहतूक फेऱ्या कमी करणे हा एक पर्यावरणीय सकारात्मक बदल आहे व त्यायोगे दूधावरील प्रकीया खर्च कमी करणे शक्य होणार आहे.

'पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा' (ईएसएमएफ) प्रकीयेमध्ये अशा गोष्टींचा समावेश केला आहे की प्रकल्पामधील वेगवेगळे उपघटक कुठलीही जमिन प्राप्त करून घेणे, लोकांचे विस्थापन करणे यामध्ये सहभागी नाहीत. जर कोणत्याही कारणाने जमिनीची निकड असलेस सदर जमिनीची खरेदी करणेची पध्दत प्रकल्पामध्ये अवलंबणेत आली आहे. लोकांची जमीन कोणत्याही पध्दतीने प्रकल्पासाठी वापरली गेली असल्यास ती बोजाविरहीत करून दिली जाईल. त्यामुळे बॅंकेचे अनैच्छीक पूनर्वसनाचे काम (ओ.पी.४१२) या प्रकल्पास लागू होणार नाही.

'पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा' (ईएसएमएफ) यासाठी अंगीकारलेली प्रकीया पध्दती एनडीएसपी पकल्पामध्ये करावयाचे गुंतवणीकी बावत स्पष्टपणे धोरण निश्चीत करते.

- कोणत्याही कमी महत्वाच्या प्रभावाचा समावेश असलेले प्रस्ताव की ज्यावरती कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही असे मान्य करून मंजूर केले जातील.
- थोडा प्रभाव असणारे प्रस्ताव चांगल्या वर्तवणूक नियमांचे पालन मान्य करून घेऊन मंजूर केले जातील.
- बऱ्यापैकी प्रभाव असणारे प्रस्ताव सुयोग्य उपाययोजनांचा समावेश करून व प्रभाव पडताळणी पध्दत निश्चीत करून मंजूर केले जातील.
- जास्त प्रभाव असणाऱ्या प्रस्तावातील पर्यावरणीय व सामाजिक प्रभावाची स्वतंत्रपणे पडताळणी केली जाईल व असे प्रस्ताव पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा अवलंब करणे बाबतच्या अटी मान्य करून मंजूर केले जातील.

प्रकल्पामध्ये सहभागी होणेसाठी महिला, मागास जाती जमाती, अन्य आरक्षीत जाती यांना कोणतेही अडथळे व बांधीलकी नाही. तथापी अशा लोकांचा अथवा गटसमूहाचा सहभाग वाढवणे साठी प्रकल्पा मध्ये माहीती, शिक्षण व संवाद प्रशिक्षण आणि क्षमता विकसीत करणे या कार्यकमांचा समावेश करणेत आला आहे. तसेच आरक्षीत गटांना इतर सर्वासारखे प्रकल्पाचे फायदे मिळावेत यासाठी सांस्कृतीक दृष्टीने परीपूर्ण असे प्रशिक्षण कार्यकमांचे

आयोजन करणेत येणार आहे. 'पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा' (ईएसएमएफ) मध्ये अशा उपाय योजनांचा समावेश करणेत आला आहे की ज्यामुळे आरक्षीत गटांना विस्तार सेवा सुविधा, वैरण विकास या यासारख्या शासनाच्या सुविधा, पशुविमा इत्यादी योजनामध्ये सहभाग वाढवणेस मदत मिळणार आहे. प्रकल्पा मधून ग्रामिण संस्थे मधील सभासद , महिला , मागास जाती जमाती , अन्य आरक्षीत जाती यांचे प्रतिनीधीत्वाशी संबधीत माहीती संकलीत होणार आहे.

ईएसएमएफ (पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा) मध्ये देखरेख व पडताळणीसाठी अशा काही अंगभूत उपघटकांचा समावेश आहे की जे प्रकल्पामध्ये अचानकपणे उदभवणाऱ्या पर्यावरणीय व सामाजिक समस्यांची सोडवणूक करू शकतील.

संस्था स्तरावरती, 'प्रकल्प कार्यान्वीत करणारी संस्था' (आय ए) प्रकल्प व्यवस्थापन कमिटी स्थापन करेल. त्यामध्ये पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन या संबधी काम करणारा एक घटक (ईएसएम) असेल. जो प्रकल्पामध्ये पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापना संबधी निर्माण होणाऱ्या प्रश्नांना जबाबदार असेल व त्यांची सोडवणूक करू शकेल. ईएसएमला (पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन या संबधी काम करणारा एक घटक) लागणारी आवश्यक पूरक माहीती व सहकार्य करणेचे काम प्रकल्प कार्यान्वीत करणाऱ्या संस्थेकडील तांत्रिक कमिटी करेल. त्याव्दारे प्रकल्पातील पर्यावरणीय व सामाजिक समस्यांची उकल केली जाईल. या पकल्पा मध्ये, प्रकल्प कार्यान्वीत करणाऱ्या संस्थेकडील अधिकाऱ्यांचे, पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापनाशी संबधीत गोष्टीसाठी प्रशिक्षण व क्षमता वाढवणे यांचा समावेश करणेत आला आहे.

सूरवातीस प्रायोगीक तत्वावरती , 'कचरा व्यवस्थापन', 'वैरण विकास' व 'मिथेन वायू उत्सर्जन' हया विषयाव्दारे प्रकल्पाची कार्यवाही हाती घेणेत आली आहे.

## संक्षिप्त शब्दरूपे

NDSP ( National Dairy Support Plan ) – राष्ट्रिय डेअरी सहाय्यता प्रकल्प.
SESA ( Strategic Environmental and Social Assessment ) – 'सेसा' – पर्यावरणीय व सामाजिक परीणामांचे धोरणात्मक विश्लेषण.
NDDB ( National Dairy Development Board ) – राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ.
FGDds ( Focussed Group Discussion ) – विशेष उद्देशाने प्रेरीत, समूहात करणेत आलेली चर्चा.
ESMF ( Environmental & Social Management Freamwork ) – पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन आराखडा.
IA ( Implementation Agency ) – 'प्रकल्प कार्यान्वीत करणारी संस्था'.
ESM (Environmental & Social Management Cell ) – पर्यावरणीय व सामाजिक व्यवस्थापन या संबधी काम करणारा एक घटक.